# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ९४-२३ दिनांक :- २१/०३/२०२३

## विनापरवाना विदेशी कंपनीच्या दारुचा साठा करणाऱ्या आरोपीतावर नायगाव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कारवाई.

नायगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नि. श्री. संतोष सांगवीकर यांना दिनांक २०/०३/२०२३ रोजी ०१.०० वाजता सुमारास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मोना इंड्स्ट्रीयल इस्टेट, उपाध्याय कंम्पाऊण्ड येथील कंपनीजवळ, चिचोंटी वसई पुर्व या ठिकाणी विदेशी कंपनीची दारु अवैधरीत्या साठा करुन ठेवलेली आहे.

सदर बाबत वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन नायगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी पंचासह जावून छापा कारवाई केली असता सदर ठिकाणी इसम नामे रवि लक्ष्मण सोलंकी, मुळ रा. गाव पदमपुर, तहसील रापर जि. कच्छ, राज्य गुजरात याच्या ताब्यात ०७,५०,१२०/- रुपये किंमीची विदेशी कंपनीची दारु विनापरवाना बाळगल्याचे निदर्शनास आल्याने तो जप्त करण्यात आला आहे. सदरबाबत पो.अंम. सचिन खताळ यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नायगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ०६/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५ (ई) व ६५ (ऐ) अन्वये दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास हा पो.हवा. चौधरी नेम. नायगाव पोलीस ठाणे हे करीत आहे. हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार तथा अति. कार्यभार परिमंडळ २ वसई, श्रीमती पद्मजा बढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि. श्री. मिलींद साबळे (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. संतोष सांगवीकर, बलराम पालकर, पो.उप.निर. गजानन जिकंलवाड, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील यांनी केली आहे.

------ooo------